# प्रेस नोट
# जातीय सलोखा समिती बैठक

जा.क्र.५४६/माहितीकक्ष/वार्तापत्र
पोलीसअधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—३०/०३/२०१६.

भंडारा जिल्हा पोलीस मुख्यालय येथील बहुउद्देशीय सभागृह येथे दि. २९/०८/२०१६ रोजी जिल्हा स्तरीय जातीय सलोख समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. जिल्हाधिकारी साहेब डॉ. अभिजीत चौधरी, मा. पोलीस अधीक्षक विनीता साहु तसेच निवासी उपजिल्हा अधिकारी श्रीमती विजया बनकर, डॉ. संपत खिल्लारी उपविभागिय अधिकारी भंडारा, दिलीप तलमले उपविभागिय अधिकारी साकोली, उपविभागिय पोलीस अधिकारी श्री. संख्ये साहेब साकोली, पोलीस उपअधिक्षक (गृह) श्री. धात्रक साहेब, पोलीस निरीक्षक स्थागुशा श्री. कोलवाडकर, हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात ही पुष्पगुच्छ देवुन स्वागत समारंभानी झाली.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. पोलीस अधीक्षक विनीता साहु यांनी सर्व प्रथम सर्वांचे आभार मानले. तसेच येणा—या सणा निमीत्य जिल्हयात शांतता राखण्यास पोलीस प्रशासन सज्ज आहे, सर्व समाज कार्यकर्ते व शांतता समितीच्या अध्यक्षांनी सुध्दा आपल्या परिने आपआपल्या जिल्हयात शांतता ठेवावी. जिल्हयात जिथे कुठे काही गुन्हे घडतांना दिसत असेल तर त्वरीत सिटीजन ॲप व प्रतिसाद ॲप किंवा पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा येथे टोल फ्रि क्र. १०० व १०९१ वर तक्रार सांगुन पोलीस प्रशासनास कळवावे. तसेच आपण आपल्या घरातील व शेजारील महिलांना सुध्दा सिटीजन ॲप व प्रतिसाद ॲप विषयी माहीती दयावी. सण उत्सवादरम्यान बॅनर लावतात ते बॅनर सण उत्सव झाल्यावर काढत नाहीत ते काढायला पाहीजे, बॅनर लावतांना त्यावर प्रिंटरचे नाव देणे व परवानगी घेणे आवश्यक आहे. डीजे मुक्त गणपती उत्सव साजरा करावे त्यामुळे ध्वनी प्रदुषण होणार नाही तसेच फटाके फोडतांना काळजी घेणे, महीलांवर अत्याचार होणार नाही याची दक्षता घ्यावी. लोकमान्य टिळकांनी यांनी गणपती उत्सवाची सुरुवात केली त्याला शंभर वर्ष पुर्ण झाली. बेटी बचाव बेटी पढाव यावर जिल्हास्तरीय पुरस्कार ठेवण्यात आले तसेच बकरी ईद व गणपती उत्सवामध्ये समाजामध्ये शांतता ठेवावी असे आव्हाहन केले. या उत्सवामध्ये दारु पेवुन शांतता भंग करणा—या व्यक्ती कडे पोलीसाचे लक्ष राहणार. अंधश्रध्देला गावातील लोक बळी जाणार नाही अशी घटना गावात घडु नये याकडे गावातील लोक लक्ष दयावेत. येणा—या सणाबाबत शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री. जिल्हाधिकारी साहेब डॉ. अभिजीत चौधरी, यांनी येणा–या उत्सवांमध्ये सर्वांनी सामंजस्य साधुन कार्य करावे भंडारा जिल्हा शांतता प्रिय जिल्हा आहे. प्रत्येक गावात एक गाव एक गणपती एक वार्ड एक गणपती अशी संकल्पना व योजना आखावी याबाबत सांगितले. कायदा व सुव्यवस्था यांचे उल्लघन होणार नाही यांची दक्षता घेण्याचे आव्हाहन केले.

यावेळी मा. डॉ. संपत खिल्लारी उपविभागीय अधिकारी भंडारा, उपविभागीय अधिकारी दिलीप तलमले साकोली, पोलीस उपअधिक्षक (गृह) श्री. धात्रक, पोनि. कोलवाडकर स्थागुशा भंडारा, पोनि. श्री. राऊत वानिशा भंडारा, रापोनि. श्री. लोळे पो.मु.भंडारा, पोलीस रुग्नालय डॉ. कोचे ,जिल्हा माहीती अधिकारी रवि गिते व पो. स्टे./शाखेचे पोलीस अधिकारी/कर्मचारी, जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, महसुल अधिकारी, उपप्रादेशिक अधिकारी, कार्यकारी अभियंता, तंटामुक्तीचे अध्यक्ष, पोलीस पाटील जातीय सलोखा समिती सदस्य, दक्षता समिती सदस्या, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार बंधु व ईतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमामाचे संचालन पो. नी. कोलवाडकर स्थागुशा भंडारा यांनी केले तर आभार प्रदर्शन उपविभागागिय पोलीस अधिकारी श्री. संख्ये साहेब साकोली यांनी केले.

(के.एच.धात्रक)
प्रभारी.पोलीसउपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

३०/३/१९

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.